**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ४८/२०१५-१६/२२२ दिनांक: ३-२-२०१६

**आदेश**
**आदेश केस क्र. ४८ /२०१५-२०१६**

१) श्री. वसंत गणेश रानडे अर्जदार
५/४२६ डॉ. लांडे हॉस्पिटलजवळ
दाते माळा, इचलकरंजी.

विरुध्द

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता, विरुध्द पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इचलकरंजी.

३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग, अ उपविभाग इचलकरंजी.

**कोरमः-** १. श्री. पी.व्ही.खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी श्री. पी.व्ही.खपली , सदस्य सचिव ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

के. क्र.४८/१५-१६ या तकारीची अंतिम सुनावणी दि. २९.१.२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर येथे पार पडली सुनावणीसाठी ग्राहक श्री. वसंत गणेश रानडे ग्राहक प्रतिनिधी सौ. अर्चना अतुल रानडे उपस्थितीत होत्या. वि.प. महावितरणतर्फे अति.कार्यकारी अभियंता श्री. प्रशांत राठी व श्री. शिवराज पाटील हे हजर होते. या तक्रारीची पहिली सुनावणी दि. २९.१२.२०१५ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर येथे झाली. त्यावेळी महावितरणने या मंचास पाठविलेल्या उत्तराची प्रत ग्राहकास दिली नसल्याचे आढळून आले. आणि याचवेळी

मंचा समक्ष त्यापत्राची प्रत ग्राहकास देण्यांत आली. हे पत्र घेतल्यानंतर ग्राहक प्रतिनिधी चर्चेत सहभागी झाल्या आपली अडचण ही त्यानी सविस्तर सांगितली वि.प. तर्फे आपले म्हणणे मांडण्यांत आले. आणि त्यावेळी ग्राहक प्रतिनिधी यांनी मला वि.प. च्या पत्रावर अभ्यास करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. आणि मंचातर्फे १९/१/२०१६ या तारखेस पुढील तारीख चर्चेसाठी देण्यांत आली पण त्यानंतर मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोग यांचे कार्यालयांत मा. सदस्य सचिव यांना उपस्थितीत राहणे आवश्यक असल्याने त्यांना दि. १९/१/२०१६ ऐवजी दि. २९/१/२०१६ बोलाविण्यांत आले. त्याप्रमाणे तक्रारदार प्रतिनिधी आणि वि.प. अधिकारी उपस्थितीत राहिले. दि. २९/१२/२०१५ आणि २९/१/२०१६ या दोन्ही तारखेला घडलेला सर्व वृत्तांत एकाचवेळी देत आहोत.

## <u>ग्राहकाची मागणी आणि तक्रारीचे स्वरुप</u>

श्री. वसंत रानडे ग्रा.क्र. २५०६४००२३२५९ यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष कोल्हापूर येथे तक्रार दाखल करुन श्री. संजय शंकर तेलनाडे या त्रयस्थ इसमांनी खोटे व बेकायदेशीर कागद तयार करुन त्या आधारे माझी फसवणूक करुन बेकायदेशीरपणे नावांत बदल करुन माझी वरील वीज जोडणी आपल्या नावांवर करुन घेतली आणि त्यानंतर ती दि. १०.४.२०१५ रोजी बंदही केली असे म्हंटले आहे त्यानी कक्षाकडे १) विनाअट माझी वीज जोडणी सत्वर चालू करणेचे आदेश व्हावेत. २) नांवात केलेला बदल बेकायदेशीर असल्याने पूर्ववत माझे नावांने वीज बिल मिळावे. ३) बेकायदेशीर वीज जोडणीमध्ये बदल करणा-या अधिका-याला योग्य ती ताकीद दयावी, तसेच मानसिक त्रासापोटी दंडात्मक कार्यवाही होऊन विनिमयाच्या तरतूदीनुसार भरपाई मिळावी असा अर्ज केला होता. अंतर्गत कक्ष कोल्हापूर यांनी आदेश देतांना असे म्हंटले आहे की, अति. कार्यकारी अभियंता, इचलकरंजी अ उ.वि. यांनी विधी विभागाकडे पाठपुरावा करुन आवश्यक तो सल्ला प्राप्त झाल्यानंतर तक्रारदाराचे कनेकशन जोडणे बाबत योग्य ती कार्यवाही करावी असे म्हंटले आहे. आणि कायदेशीर सल्यासाठी कोल्हापूर विधी विभागाकडून हे प्रकरण पुणे येथील विधी कार्यालयाकडे दि. १६.६.२०१५ नुसार सल्ला प्राप्त होण्यासाठी पाठविण्यांत आलेचा उल्लेख आपल्या आदेशामध्ये केलेला आहे. या आदेशा बाबत कांहीच निर्णय न झाल्याने श्री. वसत रानडे यांनी अ फॉर्ममध्ये केलेला अर्ज या कार्यालयांत दि. ६/११/२०१५ रोजी ग्राहकाकडून प्राप्त झाला. यामध्ये त्यानी अशी विनंती केली आहेकी, १) अंतर्गत कक्षाचा आदेश रद्द व्हावा. २) विनाअट माझी वीज जोडणी सत्वर चालू करण्या बाबत आदेश व्हावा. ३) नावामध्ये केलेला बदल हा बेकायदेशीर असल्याने कागदपत्राची शहानिशा करुन पूर्ववत माझ्या नावाने वीज देयक देण्याबदल आदेश व्हावा.४)दबावाखली बेकायदेशीरपणे वरील कृत्य करणा-या अधिका-याला योग्य ती ताकीद देण्यांत यावी. आणि झालेल्या त्रासापोटी विनिमयातील तरतूदी प्रमाणे दंडात्मक कार्यवाही होऊन रक्कम रु.५०००/- मानहानी व इतर खर्चाबदल मला मिळावेत अशी मागणी केलेली आहे.

त्यांच्या अर्जास उत्तर देतांना वि.प.तर्फे आपले म्हणणे मांडतांना असे सांगितले आहे की, श्री. संजय शंकराव तेलनाडे यांनी सि.स.नं. १७३०९ मधील मिळकत खरेदी केलेली सपूर्ण कागदपत्रे सादर करुन मिळकतीमधील एक कनेकशन ग्रा. क्र. २५०६४००२३२५९ हे स्वतःचा नावावर करण्यासाठी योग्य ती कागदपत्रे सादर केली. त्यानंतर कार्यालयाने आदेश क्र. का.अ./अ उ.वि./इचल/जेई/टी/१७६८ दि. २४.७.२०१४ अन्वये विदयुत कनेकशनचे नावात बदल या सदराखाली श्री. वसंत रानडे यांचे नावा ऐवजी श्री. संजय शंकर तेलनाडे यांचे नांव दाखल करणेत आलेले आहे त्यावेळी घेण्यांत आलेल्या आवश्यक कागदपत्रांची यादीही वि.प. तर्फे देण्यांत आली आहे व त्याच्या प्रती मंचास व ग्राहकास उपलब्ध करुन देण्यांत

आलेल्या आहेत.यानंतर श्री. तेलनाडे यांनी दि. ८/४/२०१५ रोजी ग्रा.क्र. २५०६४००२३२५९ हे स्वतःच्या नावावर झालेले कनेकशन कायमस्वरुपी बंद करण्या बाबत अर्ज सादर केला आहे. त्याचप्रमाणे ते कनेक्शन कायमस्वरुपी बंद केले. या प्रकरणांत सौ. अर्चना अतुल रानडे यांनी दि.११/७/२०१४ रोजी अर्ज सादर करुन नावात बदल करण्यास हरकत घेतल्याचे म्हंटले आहे. तसेच या संबंधीत या मिळकतीबाबत दिवाणी न्यायालय. इचलकरंजी या न्यायालयांत रे.क.नं. ३३७/२०१३ चे कामी प्रथम वर्ग यांचे न्यायालयांत रे.फौ.के.नं. ३५७ /२०१३ चे कामी दिवाणी व फौजदारी स्वरुपाचे कामे प्रलंबीत असल्याचे कळविले आहेत.तसेच कायदा सल्लागार पुणे यांचे पत्र अद्याप न आल्यामुळे अंतर्गत कक्षाचा निकाल कार्यान्वीत करता आलेला नाही अशी त्यांनी तोंडी सांगितले आणि श्री. वसंत रानडे यांच्या तक्रारी बाबत कायदेशीर सल्लागार यांचेकडून सल्ला प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यांत येत आहे, असे मंचास सादर केलेल्या पत्रात म्हंटले आहे.

तक्रारदार आणि वि.प. यांनी जोडलेले सर्व कागदपत्रे लेखी निवेदने प्रत्यक्ष सांगितलेली हकिकत वस्तुस्थिती या सर्वाचा विचार करता मंचास असे वाटते की, वर वर पहाता ही केस साधी सोपी दिसत असली तरी अत्यंत गुंतागुंतीची आहे. यासबंधी असे म्हणावे वाटते की खरेदी पत्राप्रमाणे जरी श्री. रानडे यांच्या नावा ऐवजी श्री.तेलनाडे यांचे नांव लावले असले तरी सदरची कार्यवाही ही दि. २४/७/२०१४ रोजी झालेली आहे. आणि यापूर्वी दि. ११.७.२०१४ रोजी सदर कनेकशनमधील नावांत बदल करु नये असा त-हेचे सौ.अर्चना रानडे यांचा अर्ज वि.प. च्या इचलकरंजी कार्यालयांत दिलेला आहे. पण याची नोंद घेतलेली दिसत नाही. आज दि. २९.१.२०१६ रोजी सुनावणीच्यावेळी मा. विधी सल्लागार यांचे कायदेशीर मता संबंधीचे पत्र क्र. SE/KC/LEGAL/३८५ दि. १२.१.२०१६ हे मंचास प्राप्त झाले. त्यामध्ये असे म्हंटले आहे की, The concerned electric connection be reconnected and be converted in to the name of Shri Vasant Rande cancelling the subsequent change into the name of Shri Sanjay Telnade.तसेच श्री. रानडे यांनी आपले म्हणणे सादर करतांना असे म्हंटले आहे की, श्री. संजय तेलनाडे विरुध्द इचलकरंजी येथील क.स्त. न्यायालयांत दिवाणी के.नं. ३३७/२०१३ व प्रथम वर्ग न्यायालय येथे ३५७/२०१३ या कामी काम चालून दिवाणी नि.पाच नुसार मनाईचा निर्णय झाला आहे.तसेच फौजदारी दाव्यात ही श्री. संजय तेलनाडे यांच्यावर हजर रहाणे संबंधी समन्स लागू केले आहे. या अर्जात त्यांनी इतरही कांही बाबी म्हणजेच बिलावर नांव श्री. रानडे यांचे असतांना पैसे भरल्याचे पावती व श्री. तेलनाडे यांच्यावर निघणे. व बिलावर हाताने दुरुस्ती करणे अशा गोष्टीवर हरकती नोंदविल्या आहेत. आणि मा. न्यायालयाचे तूर्तातूर्त मनाईचा हुकूमही त्यांनी मंचा समोर सादर केला आहे. आणि या सर्व बाबीचा विचार करता खालील मुदे उपस्थितीत होतात.

१. श्री. रानडे यांचा नावावर वीज जोडणी देता येईल का?

उत्तर :- होय.

२. संबंधीत अधिका-यावर कार्यवाही करता येईल का?

उत्तरः- नियमाप्रमाणे.

आदेश :- अंतिम आदेशाप्रमाणे.

## **कारण मिमांसा**

या प्रकरणात मा. दिवाणी न्यायालयाने सदर केसमध्ये परिस्थितीत कोणतेही बदल न करण्याचे (जैसे थे) आदेश दिलेले आहेत. विधी सल्लागार यांनीही श्री. रानडे यांच्या नावावर वीज जोडणी करुन

देणे बाबत आपले मत नोंदवलेले आहे.अंतर्गत कक्षानेही विधी सल्लागार यांचे पत्रापमाणे कार्यवाही करणेचा आदेश दिला आहे. या सर्वाचा विचार करता कायदेशीर आणि नियमाप्रमाणे मंचास असे वाटते की, मुददा क्र.१ चे उत्तर होय असे आहे.

मुददा क्र. २ :- आपल्या उत्तरात इचलकरंजी उ.वि. ने इतरही दोन कनेकशन असल्याचा उल्लेख केलेला आहे ते व्यापारी कनेकशन असून त्याचा या केसशी कांहीही संबंध नाही. असे अर्जदाराने प्रतिपादन केले आहे. ते मंचास योग्य वाटते. कक्षाच्या निर्णयानुसार विधी सल्लागार पुणे यांचेकडे सल्ला मागीतला असतांना पुन्हा स्थानिक वकीलांच्या कडून सल्ला घेऊन सौ. अर्चना रानडे यांना तुमच्या नावावर वीज जोडणी देता येईल असे पत्र दिल्यामुळे ग्राहकाच्या मनातील गोंधळ वाढला वि.प. ची ही ही कृती मंचास योग्य वाटत नाही. नावात बदला संबंधी सर्व कागदपत्रे पहाता क. अभियंता यांनी सादर केलेला रिपोर्ट दि. ११.७.२०१४ हा खूप महत्वाचा वा्टतो यामध्ये त्यांनी सदर ग्राहकाचे मिटर बदलण्यासाठी गेले असता सध्याच्या ग्राहकाच्या नातेवाईकांनी विरोध करुन तक्रार अर्ज दिलेला सोबत जोडला आहे.असे म्हंटले आहे श्री. वसंत रानडे यांची सून सौ. अर्चना रानडे यांनी दि. ११.७.२०१४ रोजी नावात बदलास हरकत घेतलेचे दिसून येते. वि.प. च्या या कृती मूळ मागणीकडे दूर्लक्ष करणा-या वाटतात सबब कोणी दोषी आढळल्यास योग्य ती नियमाप्रमाणे कारवाई व्हावी असे मंचास वाटते.

अर्जदाराने मागणी केलेल्या मानहानी व इतर खर्चापोटी मागितलेली भरपाई यावर विचार करावा असे मंचास वाटत नाही. या सर्व प्रकरणामध्ये मंच या निर्णयाप्रत आला आहे की. श्री वसंत रानडे यांचे नांवे महावितरणकडे असलेली सुरक्षा ठेव त्यांचे वीज जोडणीसाठी उपयोगात आणून श्री. वसंत रानडे यांना वीज जोडणी देण्यांत यावी. महावितरणच्या नियमानुसार योग्य ती कागदपत्रे घेवून मा. न्यायालयाचा मान राखून सन्मान पूर्वक सर्व परिस्थिती पूर्वीप्रमाणे ठेवण्यांत यावी. यानंतर या सर्व प्रकरणांत मा. न्यायालयाचा जो अंतीम निर्णय लागेल तो सर्व संबंधीतावर बंधनकारक राहणार आहे.याची नोंद घेणेत यावी.

## आदेश

१. श्री. वसंत गणेश रानडे यांच्या नांवावर वीज जोडणी देण्यांत यावी.

२. दोषीवर नियमाप्रमाणे कारवाई व्हावी.

३. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४. निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ३-०२-२०१६

(पी. व्ही.खपली )
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

श्री. पी. एस. बुरांडे,
ग्राहक सदस्य,

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.